**CNR : MHST05-000255-2012**

**नियमीत दिवाणी मुकदमा क्र. १५४/२०१२**

पारुबाई दत्तू माने तर्फे म.वा. ..... **वादी**

**वि.**

शेवंताबाई महादेव माने तर्फे म.वा. ...**प्रतिवादी**

**नि. ७८ वरील आदेश**

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी केलेला आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे दिलेले नसल्याने त्यांचेविरुध्द दि.०५/०४/२०१९ रोजी आदेश पारीत करुन प्रस्तुतचा अर्ज विना म्हणणे चालविणे आला.

३. वादीच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. वादींच्या वकिलांचे निवेदन असे की, दावा चालू असताना प्र. वादी नं.१ मयत झालेल्या आहेत. त्याचे तथाकथित वारसांनी ता. ९/०५/२००६ रोजीचे तथाकथित मृत्यूपत्रावरुन याकामी हक्क सांगितलेला आहे. सदरचे मृत्यूपत्र हे बनावट, खोटे व लबाडीचे असे आहे. त्यामुळे या कामी वादी हेच दावा मिळकतीचे पुर्ण मालक झालेले आहेत. त्यामुळे मूळ वाटपाचे दाव्यात परिच्छेद क्र. ९ मध्ये, आकारणी, सरनाम्यात दावा रुपये व विषयाची किंमत यामध्ये, तसेच दावा कलम ११ पुर्वी ११अ आणि विनंती कलम १४ मध्ये कलम १४अ चे अगोदर (१) अशी प्रस्तुत अर्जात सविस्तर नमूद केलेप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती करणेची आहे. या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही व प्रतिवादीचे कसलेही नुकसान होणार नाही.

४. वादींनी मागितलेली दुरुस्ती व दाव्यातील मागणी यांचा विचार केला असता सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याच्या मुळ कथनामध्ये व स्वरुपामध्ये कसलाही बदल होणार नाही. त्यामुळे प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. या प्रस्तावित दुरुस्तीबाबत प्रतिवादींना जादा म्हणणे देण्याची संधीही मिळणार

आहे. त्यामुळे वाद विषयाचे निराकरण होण्यासाठी वादीने मागितलेली प्रस्तावित दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. मी खालील आदेश देतो.

## आदेश

अर्ज मंजूर केला आहे. वादीने प्रस्तावित दुरुस्ती पूढील तारखेस किंवा तत्पुर्वी करुन घ्यावी.

(न्यायासनावर अधिघोषीत केले)

कराड.
दि. २०/०६/२०१९

**(प्र. अ. सवदीकर)**
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड